## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

### तक्रार क्रमांक : १४८९-अ/२०२२

**तक्रारकर्ता,** श्री.विष्णू कृष्णा पाटील,
अंकीता अपार्टमेंट, रुम नं. ४,
वर्धमान नगर, भानवज रोड,
खोपोली, ता.खालापूर, जि.रायगड ४१० २०३.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी,
खोपोली नगरपरिषद, खोपोली,
ता.खालापूर, जि.रायगड ४१० २०३.

तत्कालीन जन माहिती अधिकारी,
खोपोली नगरपरिषद, खोपोली,
ता.खालापूर, जि.रायगड ४१० २०३.

**तक्रार सुनावणीचा दिनांक : १६/१०/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| ६/६/२०२२ | ---- | २५/७/२०२२ | २३/८/२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.१७/११/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही" असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक १६/१०/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.प्रशांत कुलकर्णी, लघुटंकलेखक, खोपोली नगरपरिषद व तत्कालिन जन माहिती अधिकारी श्रीमती मयुरी पाटील, सध्या कार्यरत-लिपिक, खोपोली नगरपरिषद उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" सहाव्या वेतन आयोगाच्या वेतन निश्चिती फरक रक्कमेच्या थकीत देणे (निवृत्त कर्मचाऱ्यास) असलेली रक्कम देण्याबाबत उपरोक्त विषयाचे अनुषंगाने प्र.जिल्हा प्रशासन अधिकारी नगर विकास शाखा, श्रेणी १, रायगड अलिबाग यांचेकडील पत्र क्र.नपाप्राकार्या-३/विष्णू पाटील/५५०३/२०२१ दि.१/२/२०२१ चे पत्रानुसार नगर परिषदेस वरील विषयाबाबत कार्यवाहीचा अहवाल सादर करणेबाबत कळविले आहे. त्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालय रायगड अलिबाग प्र.जिल्हा प्रशासन अधिकारी नगर विकास शाखा, श्रेणी १, रायगड अलिबाग या कार्यालयास सादर केलेल्या कार्यवाही अहवालाची प्रत मिळणेबाबत"*

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.२३/८/२०२२ रोजी, "*अपिलार्थींना विनाशुल्क माहिती १५ दिवसात देणेत यावी.*" असा निर्णय दिलेला आहे.

तक्रारकर्ता यांनी निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झाली नाही. त्यांनतर दाखल प्रथम अपीलामध्ये अपीलीय अधिकारी यांनी दि.२३/८/२०२२ रोजी आदेश पारीत करून अपीलार्थींना विनाशुल्क माहिती १५ दिवसात देण्यात यावी असे आदेश दिले. त्यानंतर देखील अद्यापपर्यंत माहिती दिली नाही.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली माहिती ८ दिवसात जलद टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर तक्रारकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालिन जन माहिती अधिकारी श्रीमती मिनल जाधव, खोपोली नगरपरिषद यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक ६/६/२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.२४/११/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १६ ऑक्टोबर, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीमती मिनल जाधव, खोपोली नगरपरिषद **- यांना प्रत** --
--मुख्याधिकारी,
खोपोली नगरपरिषद, खोपोली,
ता.खालापूर, जि.रायगड ४१० २०३. **यांचेमार्फत रवाना.** (मुख्याधिकारी यांनी सदर आदेशाची प्रत संबंधित तत्कालिन जन माहिती अधिकारी यांना तात्काळ बजावून पोहोच आयोगास सादर करावी)